जावक क्र. मरारविम/१९/सव्यसं(२)/पप्रवि/२०२१/७७०
दिनांक- ०४.०८.२०२१

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**

म.रा.र.वि.म.
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

प्रति,
**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,
विधान भवन मार्ग, मुंबई – ४०० ०३२.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
आवक क्रमांक : 4953
दिनांक : 9 AUG 2021
वेळ :............, स्वाक्षरी :............

**विषय : महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषदच्या सन्मा. विद्यमान सदस्यांच्या व माजी सदस्यांच्या वाहनास पथकर फी मध्ये फास्टॅग द्वारे सूट देणेबाबत.**

**संदर्भ :** महामंडळाचे पत्र क्र. मरारविम(मर्या)/१९/सव्यसं-२/पप्रवि/२०२१/५९ दि. १९.०१.२०२१

महोदय,

या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषदच्या विद्यमान सदस्यांच्या तसेच माजी सदस्यांच्या वाहनास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे पथकर नाक्यांवर पथकर फी मध्ये फास्टॅग द्वारे सूट देणेबाबतच्या कार्यवाही विषयी कळविण्यात आलेले आहे.

आपल्या कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या पत्रातील तपशिलानुसार सर्व सन्मानीय विद्यमान सदस्यांच्या/माजी सदस्यांच्या वाहनावर लावलेल्या फास्टॅग द्वारे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निर्माण केलेले महामार्ग, मुंबई मधील प्रवेश नाके, राजीव गांधी सागरी सेतू इ. फक्त खालील नमूद केलेल्या प्रकल्पाच्या पथकर नाक्यांवर पथकर फी मध्ये सूट (Exemption) देण्यात आलेली असून वेळोवेळी प्राप्त पत्रांवर तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रकल्पाच्या पथकर नाक्यांची यादी**

| अ.क्र. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रकल्पाचे नाव | पथकर नाके |
|---|---|---|
| १. | मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग | १. शेडूग, २. खालापूर, ३. कुसगाव ४. तळेगाव |
| २. | मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ | १. शिळफाटा, २. देहू रोड, ३. शेडूंग, ४. कुसगाव |
| ३. | मुंबईतील पाच प्रवेश पथकर नाके | १. वाशी, २. मुलुंड (EEH), ३. मुलुंड (LBS), ४. ऐरोली ५. दहिसर (WEH) |
| ४. | राजीव गांधी सागरी सेतू | १. वांद्रे –वरळी सी लिंक |
| ५. | सातारा कागल राष्ट्रीय महामार्ग | १. किणी, २. तासवडे |

सीआयएन: U45200MH1996SGC101586
जीएसटी: 27AAACM6833C1ZP
नोंदणीकृत कार्यालय: नेपियन्सी रोड, प्रियदर्शनी पार्क जवळ, मुंबई -४०००३६
दूरध्वनी: (०२२) २३६८ ५९०१
दूरध्वनी: (०२२) २३६१ ३७८९
दूरध्वनी: (०२२) २३६९ १०३०
कॉर्पोरेट कार्यालय: वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटलजवळ, के.सी. मार्ग, वांद्रे (प), मुंबई - ४०००५०
दूरध्वनी: (०२२) २६४० ०११० / २०१
दूरध्वनी: (०२२) २६५५ ८१७५ / ७६
फॅक्स: (०२२) २६४१ ७८९३
www.msrdc.org

तथापी राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) प्रकल्पाचे पथकर नाके तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (NHAI) पथकर नाके हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीत नसल्याने त्या पथकर नाक्यांवर पथकर फी मध्ये सूट देता येत नाही. विद्यामान सदस्यांची वाहने वरील दोन विभागाच्या राज्यातील विविध पथकर नाक्यावरुन प्रवास करताना त्याठिकाणी फास्टॅग चालत नसल्याच्या अथवा फास्टॅग मध्ये बॅलेन्स नसल्याच्या तक्रारी सन्मा. सदस्यांकडून करण्यात येत आहेत, त्यास्तव विनंती की, सर्व सन्मा. सदरस्यांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रकल्पावरील पथकर नाक्यांची यादी आपणाकडून अवगत करण्यात यावी जेणेकरुन त्यांचा गैरसमज होणार नाही.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अखत्यारीतील पथकर नाक्यावर पथकर फी मधून सूट मिळणेबाबत विधानमंडळ सचिवालयाकडून संबंधित विभागास कळवून योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे हि विनंती.

आपला

4/8/21

(कमलाकर फंड)

**मुख्य महाव्यवस्थापक (पप्रवि)**

**म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.**